# दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १०७९/२०२५ नि. क्र. १ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी कलम ८ अन्वये बॉम्बे रेग्युलेशन नुसार वारसा दाखला मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत कामातील मयत **चंद्रकांत दत्ताजी धोडहिप्परगे** हे दि.२६/०८/२०१० रोजी मयत झाल्याचे आढळून येत आहे. प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार यांनी त्यांचे भाऊ चंद्रकांत दत्ताजी धोंडीपरगे यांचे वारस प्रमाणपत्र मागितले असून दाखल केलेल्या मृत्यु प्रमाणपत्रावर भावाचे नाव **चंद्रकांत दत्ताजी धोडहिप्परगे** असे नमूद असल्याचे आढळून येत आहे. तसेच अर्जदार यांनी त्यांचे ओळखपत्र अभिलेखावर दाखल केल्याचे दिसून येत नाही. तरी अर्जदार यांनी **मयताचे नाव असलेली शिधापत्रिका, मयताचे अचूक मृत्यु प्रमाणपत्र व स्वतःचे ओळखपत्र** अभिलेखावर दाखल करावे. याबाबत अर्जदार यांनी पुर्तता करून सविस्तर युक्तीवाद करावा.

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2026.03.25 10:55:59 +0530

उदगीर
दि.२४/०३/२०२६

**(के. ए. यादव)**
२ रे दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
उदगीर